# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 07.12.2025** **वार- रविवार**

---

**मॅरथॉन**

पुण्याची ओळख असणारी पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेच्या४२ किलोमीटरच्या पूर्ण मॅरेथॉनमध्ये इथोपियाचा हैमानुतआगेन्यू विजेता ठरला. तर इथोपियाचाच डेरेज्जे अलेमो उपविजेता ठरला आहे. लष्कराचा खेळाडू तीर्थ कुमार पून हा आंतरराष्ट्रीय गटात तिसरा तर भारतीय गटात पहिला आला. महिला गटात साक्षी जड्याळ ही महिला गटात पूर्ण मॅरेथॉनची विजेती ठरली. तर मेसेरत तुलू ही इथियोपियाची धावपटू उपविजेती ठरली. याच देशाची वारे बाँटू दिमेसे तिसऱ्या स्थानावर राहिली. 21 किलोमीटरच्या हाफ मॅरेथॉनमध्ये महिलांच्या गटात हरियाणाची भारती सिंग विजेची तर नाशिकची रवीना गायकवाड उपविजेती ठरली. पुरुषांच्या अर्ध मॅरेथॉन स्पर्धेत भारतीय खेळाडूंचं वर्चस्व पाहायला मिळाले. सचिन यादवनं या गटात अव्वल स्थान पटकावलं. राज तिवारी आणि मुकेश कुमार अनुक्रमे दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानावर राहिले. याशिवाय दहा किलोमीटर प्रकारात अभिषेक देवकाते, पाच किलोमीटर प्रकारात सुहास सावरतकर आणि व्हील चेअर गटात सोमनाथ जाधव अव्वल आले. स्पर्धेला आज पहाटे तीन वाजता सणस मैदानापासून सुरुवात झाली स्पर्धेमध्ये 70 परदेशीखेळाडूंसह पंधरा हजार धावपटूंनी सहभाग नोंदवला. विजेत्यांना पुणे महापालिकेच्या वतीने 30 लाख रुपयांपर्यंतची पारितोषिके प्रदान करण्यात आली.

**रेल्वे अतिरिक्त गाड्या**

गेल्या काही दिवसांपासून विमान उड्डाणांवर झालेल्या परिणामामुळे भारतीय रेल्वे सेवेने आपल्या विविध विभागांमध्ये पुढच्या दोन दिवसांसाठी 89 विशेष रेल्वे गाड्या सोडण्याची घोषणा केली आहे. मध्य रेल्वे विभागात पुणे ते बेंगळुरू, पुणे ते दिल्ली आणि मुंबई ते दिल्ली यासह विविध मार्गांवर 14 विशेष गाड्या सोडण्यात येणार आहेत.

**शून्य कुष्ठरोग प्रसार**

राज्य सरकारने 2027 पर्यंत शून्य कुष्ठरोग प्रसाराचे ध्येय निश्चित केले आहे. त्यामुळे राज्यभरात कुष्ठरुग्ण शोध मोहीम राबविण्यात येत आहे. जास्तीतजास्त नवीन कुष्ठरुग्ण शोधून त्यांच्यावर औषधोपचार सुरू करणे आणि संसर्गाची साखळी खंडित करणे हा उद्देश या मोहिमेमागे आहे. ही मोहीम पूर्ण झाल्यानंतर अंतिम अहवाल सरकारकडे सादर करण्यात येईल, अशी माहिती आरोग्य उपसंचालक डॉ. राधाकिशन पवार यांनी दिली. सार्वजनिक आरोग्य विभागाकडून 17 नोव्हेंबर ते 2 डिसेंबर या कालावधीत कुष्ठरुग्ण शोध मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेंअंतर्गत 8 कोटी 66 लाख लोकसंख्येचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. यात ग्रामीण भागावर अधिक भर देण्यात आला आहे. ग्रामीण भागामध्ये दुर्गम परिसराह संपूर्ण लोकसंख्या आणि शहरी भागात झोपडपट्टी भाग, स्थलांतरित कामगारांच्या वसाहतीसह 30 टक्के लोकसंख्येची तपासणी करण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. या मोहिमेत 1 कोटी 73 लाख घरांचे सर्वेक्षण करण्यात येत आहे, अशी माहिती आरोग्य विभागाने दिली.

**बाजार भाव**

गुलटेकडी इथल्या पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह कर्नाटक, गुजरात, तामिळनाडू, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश या राज्यातून सुमारे शंभर ट्रक फळभाज्यांची आवक झाली. तसंच कोथिंबिरीच्या दीड लाख तर मेथीच्या ऐंशी हजार जुड्यांची आवक झाली. पालेभाज्यांची आवक वाढली असली तरी मागणी कायम असल्याने दर स्थिर आहे. लग्नसराईच हंगाम संपत आल्याने फुल बाजारात फारशी मागणी नसून सुट्ट्या फुलांचे दर निम्म्याने खाली आले आहे.

**दगडूशेठ आरास**

संकष्टी चतुर्थी निमित्त आज पुण्याच्या दगडूशेठ गणपती मंदिरात पालेभाज्यांची आरास करण्यात आली होती.

**संस्कृतीच्या संकल्पनेवर उद्याने**

पुण्यात आता भारतातील वेगवेगळया राज्याची संस्कृती पुणेकरांसह, पर्यटकांना अनुभवता येणार आहे. त्यासाठी पुणे महापालिकेकडून देशभरातील 29 राज्यांच्या संस्कृतीच्या संकल्पनेवर आधारीत उद्याने उभारण्यासाठी आराखडा करण्यात येणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी दिली. त्या सोबतच, महापालिकेची अनेक उद्याने जुनी झाल्याने ती पुनर्विकसित केली जाणार असून यासाठी शहरातील वेगवेगळया कला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची मदत घेवून अनोख्या संकल्पनावर उभारली जावीत अशा सूचनाही त्यांनी केल्या आहेत. शहरात महापालिकेची सुमारे 220 हून अधिक उद्याने असली तरी त्यातील काही ठराविक उद्यानेच वेगवेगळया संकल्पनांवर आधारीत आहेत. याच उद्यानांना पर्यटक मुख्यत्वे भेट देतात. त्यामुळे सर्वच उद्याने पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी तयार केली जावीत तसंच शहरात सार्वजनिक ठिकाणे, मुख्य चौकांमध्ये सुशोभिकरण करावे यासाठी आयुक्त राम यांनी नुकतीच बैठक घेतली.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज किमान तापमान 12 पूर्णांक 9 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं, उद्याही साधारणपणे असंच तापमान राहण्याचा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**